**कृपया प्रसिध्दिसाठी** **9 मार्च, 2010**

## पशुवैद्यक महाविद्यालयाच्या नावात अजूनही 'बॉम्बे'च

***नाव न बदलल्यास आंदोलनाचा इशारा***

**मुंबई, मंगळवार :** गोरेगावातील पशुवैद्यक महाविद्यालयाबाहेर नुकताच नामफलक लागला असून त्यात इंग्रजीमध्ये महाविद्यालयाचे नाव 'बॉम्बे व्हेटरनरी कॉलेज' असे लिहीले आहे. या फलकाची तात्काळ नोंद घेत हा फलक चोवीस तासांत काढून इंग्रजीतही 'मुंबई व्हेटरनरी कॉलेज' असा फलक लावावा अन्यथा भारतीय जनता पार्टी आंदोलन करेल, असा इशारा माजी केंद्रीय मंत्री श्री. राम नाईक यांनी आज दिला आहे.

1984 पासून गोरेगावात हे पशुवैद्यकीय महाविद्यालय आहे. मात्र त्याचे नाव 'बॉम्बे व्हेटरनरी कॉलेज' असल्याचा 'शोध' स्थानिकांना नुकताच लागला कारण बाहेर तसा फलक अलिकडेच झळकला. तो फलक पाहून भाजपा नेते श्री. राम नाईक यांना धक्काच बसला. एकेकाळी पूर्णपणे शासकीय अंमलाखालील या महाविद्यालयाला 'बॉम्बे'चे मुंबई होऊन 15 वर्षे होत आली तरी त्या बदलाचा पत्ताच नसावा. शासनाचे आदेश महाविद्यालयापर्यंत पोहोचले नाहीत की हा फलक केवळ गलथापनणाचा नमुना आहे याची माहिती काढल्यानंतर सगळीकडेच इंग्रजीत हे नाव 'बॉम्बे व्हेटरनरी कॉलेज' असे लिहीले जाते हे श्री. राम नाईक यांच्या लक्षात आले. त्याबरोबर त्यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पत्र लिहून तो फलक काढून टाकून इंग्रजीतही Mumbai Veterinary College असे नाव लिहिण्याची विनंती करणारे पत्र लिहीले आहे.

कागदोपत्री नाव बदल होण्यास वेळ लागतो परंतु ती प्रक्रिया सुरु करावी व बाहेरील फलक तात्काळ काढावा. चोवीस तासांत फलक बदलला न गेल्यास भाजपा आंदोलन करेल, असा इशाराही श्री. राम नाईक यांनी दिला आहे.

**(कार्यालय सचिव)**


मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय
BOMBAY VETERINARY COLLEGE